**प्रेस नोट दिनांक १८/०७/२०१९**

**अलंकार पोलीस स्टेशन चांगली कामगिरी**

**नाल्यातील चेंबर मध्ये अडकलेल्या इसमास सुखरुप बाहेर काढले**

---

दिनांक १७/०७/२०१९ रोजी अलंकार पोलीस स्टेशन कडील मपोशि एल.व्ही.ओतारी व मपोशि एस.ए.गायकवाड हया दिवसपाळी कर्तव्यावर हजर असताना सायं १७.०० वा चे दरम्यान पो.स्टे हददीत पेट्रोलिंग करीत असताना अलंकार पो.स्टे शेजारील नाला येथे असलेल्या ड्रेनेज लाईन चेंबरमधुन आवाज येत होता सदर आवाजाचे दिशेने जावुन पाहणी केली असता सदर चेंबरमध्ये इसम नामे युवराज किसन फाले वय ३५ वर्षे रा. गणेशनगर ओटा वसाहत पुणे हा वेडसर असुन तो सुमारे २ ते ३ तासापुर्वी त्या चेंबरमध्ये पडलेला होता. सदर इसम हा मदतीसाठी सर्वाना आवाज देत होता परंतु नाल्यातील पाण्याचा आवाज व शेजारी असणा-या रस्त्यावरील वाहनांचा आवाज यामुळे सदर आवाज हा कोणाच्याही लक्षात आला नाही. महिला कर्मचारी रस्त्याचे बाजुने जात असताना त्यांना थोडासा आवाज ऐकु आल्याने थोडोसे थांबुन आवाजाची दिशा समजावुन घेवुन महिला कर्मचारी यांनी तात्काळ येथे जावुन पाहीले चेंबरमध्ये इसम पडल्याचे दिसले कर्मचारी त्यांनी त्यास धीर देवुन थांबण्यासा सांगितले सदर इसम हा घामाघुम झालेला होता कारण सदरचे चेंबर खोल होते व वरती येण्याकरीता कोठेही पकडण्यास जागा नव्हती. महिला कर्मचारी यांनी पोलीस नाईक ४६३८ मोरे यांना तात्काळ घटनास्थळी बोलावुन घेवुन त्यांचे मदतीने चेंबर मध्ये अडकलेल्या इसमास सुखरुप बाहेर काढले व त्यांचे नातेवाईकाच्या ताब्यात दिले. सदर कामगिरी ही पोलीस नाईक ४६३८ मोरे, मपोशि ८००१ एल. व्ही. ओतारी व मपोशि ९२४२ एस. ए. गायकवाड यांनी केलेली आहे.